## प्रकरण - पहिले

# मराठी अनुवादित कादंबरी : एक मागोवा

* प्रस्तावना:
* अनुवाद म्हणजे काय?
* अनुवादाचे स्वरूप
* अनुवादाची परंपरा
* अनुवाद : शास्त्र की कला
* अनुवादकांची भूमिका
* अनुवादाचे महत्त्व
* कादंबरीची संकल्पना
* कादंबरीची व्याख्या
* अनुवादित कादंबरी :'पर्व'
* समारोप
* संदर्भसूची

## प्रस्तावना

भारत हा खंडप्राय विशाल देश आहे. त्याला सामाजिक, सांस्कृतिक अशी परंपरा लाभलेली आहे. भारतामध्ये अनेक भाषा बोलल्या जात असल्याने भारत हा बहुभाषिक देश म्हणूनही ओळखला जातो. बहुभाषिक देशामध्ये साहित्याच्या क्षेत्रामध्ये ही विपुलता दिसून येते, पण अनुवादाच्या बाबतीत मात्र म्हणावी तितकी विपुलता दिसून येत नाही. आज यंत्रयुगामध्ये विविध प्रातांशी जवळिकता साधणे, देवाण - घेवाण करणे गरजेचे बनले आहे. देशादेशांमध्ये सांस्कृतिक जवळिकता निर्माण करण्यासाठी अनुवादांना महत्त्व येऊ लागले आहे. अनुवाद शास्त्राचा अभ्यास प्रथम पाश्चात्त्य देशांमध्ये झालेला असला तरी अलीकडच्या काळात भारतामध्येही अनुवाद शास्त्राचा उदय होऊ लागला आहे. मात्र झपाट्याने होणाऱ्या वैश्विक आदान - प्रदानामुळे अनुवादांची गरज जाणवत आहे. यातूनच विविध भाषांतील साहित्यकृती मराठीमध्येही अनुवादित होताना दिसतात.

विविध भाषातील उत्तमोत्तम कादंबऱ्यांचे अनुवाद करून लेखकांनी मराठी साहित्याचे दालन समृद्ध केले आहे. अव्वल इंग्रजी कालखंडापासून ते आजपर्यंत मराठी साहित्यामध्ये अनेक अनुवाद झालेले आहेत. भारतात प्राचीन काळापासून अनुवाद होत आहेत. उदा. ज्ञानेश्वरी हा गीतेचा अनुवाद आहे. जर्मन, फ्रान्स, रशिया या भाषेतील कलाकृती या इंग्रजी मधून मराठीमध्ये आलेल्या दिसतात. अनुवादाच्या क्षेत्रामध्ये 'भाषांतर' आणि 'भाषांतर शास्त्र' यांना अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. देशादेशांमधला संपर्क अधिक वाढल्यामुळे असे होणे स्वाभाविक आहे. साहित्य, विज्ञान, सामाजिकशास्त्रे, कलामीमांसा इ. विविध विषयावरील ग्रंथ एका भाषेतून दुसऱ्या भाषेत अनुवादित झालेले आहेत. भारतीय परंपरेत भाषांतर विद्येचा अभ्यास फारसा झालेला नसला तरी पाश्चात्त्य देशात याची जाणीवपूर्वक सुरुवात झाली आहे.

आज भारतामध्ये मराठी, हिंदी, तेलगू, कन्नड, तामीळ, पंजाबी, बंगाली, उर्दू, इंग्रजी अशा अनेक भाषा अस्तित्वात आहेत. या भाषेतील महत्त्वाच्या कलाकृतींचा मराठीमध्ये अनुवाद होणे गरजेचे आहे. यासाठी विद्यापीठामधून भाषांतर विद्येचे

अभ्यासक्रम सूरू झालेले दिसून येतात. वरील गोष्टीचा विचार करता अनुवादित साहित्याचा अभ्यास महत्त्वाचा वाटतो. म्हणूनच या सर्वांचा विचार करून प्रस्तूत प्रकरणाची रचना केलेली आहे. प्रस्तूत प्रकरणामध्ये अनुवाद म्हणजे काय, अनुवादाची व्याख्या, अनुवादाचे स्वरूप आणि मराठी अनुवादित कादंबरीचा आढावा होणार आहोत.

## अनुवाद म्हणजे काय?

'वाद' या धातूचा 'अनु' हा उपसर्ग जोडून अनुवाद हा शब्द बनलेला आहे. एका भाषेमध्ये सांगितलेली गोष्ट अर्थ न बदलला समाज रूपाने दुसऱ्या भाषेत सांगणे म्हणजे अनुवाद. म्हणजेच अर्थ या घटकावर अनुवाद या शब्दाचा संपूर्ण डोलारा उभा असतो, हे स्पष्ट होते.

सदा कऱ्हाडे यांच्या मते, ''भाषांतर हा शब्द इंग्रजीतील 'Translation' याचा पर्याय आहे. आणि इंग्रजी शब्दाचे मूळ 'लॅटिन' मध्ये आहे. 'Trans' म्हणजे 'पलीकडे अथवा दुसरीकडे' आणि 'Lation' म्हणजे 'घेऊन जाणे' मूलतः या शब्दाचा अर्थ 'स्थलांतर' असा आहे. आणि 'दुसरीकडे घेऊन जाणे' या वाच्यार्थाचा कालांतराने लाक्षणिक अर्थ रूढ झाला. आणि 'एका भाषेत व्यक्त झालेले उपयोजना होऊ लागले?''[१] असे अनुवाद म्हणजे काय स्पष्ट झाले आहे.

''अनुवाद' या शब्दाचा योगिक अर्थ 'एखाद्याच्या बाजूने बोलणे' असा आहे. हे बोलणे दोन्ही प्रकारचे असू शकते 'एखाद्याचे बोलून झाल्यावर प्रत्यूत्तर दाखल बोलणे' आणि ''एखाद्याच्या किंवा स्वतःच्या बोलण्याची पुनरावृत्ती करणे, या शब्दाला स्वतंत्र पारिभाषिक शब्द प्राप्त झालेला आहे''[२] असे कल्याण काळे यांना वाटते. एका भाषेतील संहिता दुसऱ्या भाषेत उतरवून प्रतिसंहिता तयार करणे म्हणजे अनुवाद, असे सर्व सामान्यपणे म्हटले जाते. मूळ साहित्यकृतीची अथवा अन्य मजकूराची लक्ष्य भाषेत केलेली प्रतिनिर्मिती असेही संबोधले जाते.

यावरून अनुवाद ही संज्ञा व्यापक आहे, हे दिसून येते. अनुवादाच्या अभ्यासाला प्रारंभ अलीकडच्या काळामध्ये झाला असला तरी, अनुवादाची परंपरा मात्र प्राचीन

आहे. हे प्रत्ययाला येते. विविध व्याख्यामधून अनुवादाचे अर्थ स्पष्ट झाले आहेत, त्याचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

**अनुवादाच्या व्याख्या**

अनेक अभ्यासकांनी अनुवाद या संल्पनेचा शास्त्रशुद्ध अभ्यास केला आहे. यानंतर अनुवादाच्या व्याख्या लक्षात घेऊ.

लक्ष्मण शास्त्री जोशी यांनी संपादित केलेल्या मराठी विश्वकोशामध्ये पुढील व्याख्या आलेली आहे,

'' अनुवाद' म्हणजे दुसऱ्या भाषेत अनुवाद असे आपण समजतो, अन्य भाषिक अनुवादालाच भाषांतर असे म्हणतात.''[३]

भाषांतर म्हणजे काय या विषयी भालचंद्र नेमाडे लिहितात,

''भाषांतर ही एका संहितेची एका भाषिक सांस्कृतिक आवरणातून दुसऱ्या भाषिक आवरणात स्थानांतर करणारी द्वैभाषिक प्रक्रिया आहे. ..... भाषांतर म्हणजे एका भाषेतील, वाक्यातील अर्थ दुसऱ्या भाषेतील वाक्यामध्ये जसाच्या तसा आणणे''[४]

'भाषांतरमीमांसा' या पुस्तकात कल्याण काळे म्हणतात,

''भाषांतर म्हणजे एका भाषेतील मजकूर त्याचा आशय आणि अभिव्यक्तिजन्य अनुभव यांसह दुसऱ्या भाषेत उतरवण्याची प्रक्रिया''[५]

सारस्वत कोशामध्ये अनुवादाचा अर्थ, ''एका भाषेतील ग्रंथ, वाक्य इ. चा दुसऱ्या भाषेत केलेला अर्थ किंवा तो दुसऱ्या भाषेत नेणे, तर्जुमा''.[६]

त्याचबरोबर म. वि. फाटक आणि रजनी ठकार यांनी संपादित केलेल्या 'अनुवाद शास्त्र की कला' या पुस्तकामध्ये सी. के. रेबीन यांची व्याख्या आलेली आहे ती पुढीलप्रमाणे,

"A Translation is process by which a spoken or written utterance takes place in one language which is intended and presumed to convey the some meaning as a previously existing utterance in another language."[७]

अनुवादाच्या संदर्भात विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी पुढील मत नोंदविले आहे, अनुवाद हा इंग्रजीत नवीन बनलेल्या शब्दापैकी दिसतो. प्राचीन संस्कृतात हा शब्द आढळत नाही. कारण त्याच्या प्रयोगाचे कधी कारणच पडले नसावे. भोवतालची राष्ट्रे कमी ज्ञान संपन्न असल्यामुळे त्यांच्या ग्रंथाची नोंद संस्कृतात व्हावी असा मोठा योग नाही..... पुढे संस्कृतात मागे पडून प्राकृत किंवा संस्कृताचे त्यात भाषांतर करण्याचा प्रसंग आला पण त्यास भाषांतर ही संज्ञा नसून छाया म्हणजे प्रतिबिंब आपल्या मराठीत ही जूने लोक वरील शब्द मानीत नाहीत तर, त्याच्या जागी प्राकृतात अर्थ करणे असे मानतात, अथवा टीका, व्याख्या हे शब्द घालतात तेव्हा प्रस्तुत शब्द शुद्ध इंग्रजीतील आहे असे वाटते.[८]

'अनुवाद' या शब्दाला अनेक अर्थ चिकटलेले आहेत. विविध शब्दकोशात अनेक अर्थ पहावयास मिळतात. दाते - कर्वे यांच्या शब्दकोशात 'अनुवाद' या शब्दासाठी पुन्हा-पुन्हा सांगणे, स्पष्ट करणे, पाठ करणे. असे अर्थ दिले आहेत. हे शब्द अनुवादाच्या रूढ अर्थापेक्षा व्यापक आहेत असे दिसते.

कल्याण काळे यांच्या मते, ''वैदिक वाङ्मयामध्ये धार्मिक कृत्यातील निरनिराळ्या कृती करण्याचे आदेश ज्यातून दिलेले असतात अशा मजकूराला विधिवाक्य असे म्हणतात आणि विधिवाक्याचे विवरण करणाऱ्या मजकु राला अनुवाद असे म्हणतात''.[९]

यावरून आपणाला असे म्हणता येईल की, एका भाषेतील आशय मूळ मजकूरासहित दुसऱ्या भाषेमध्ये आणण्याची क्रिया किंवा मूळ कलाकृतीची संहिता दुसऱ्या भाषेत उतरवून त्याची प्रतिसंहिता तयार करणे म्हणजे 'अनुवाद' होय. अनुवादाची सर्वसामान्या कल्पना म्हणजे एका भाषेतला आशय दुसऱ्या भाषेत प्रतिनिर्माण करणे असे म्हणणे रास्त ठरेल.

## अनुवादाचे स्वरूप

अनुवादाच्या व्याख्येवरून आपल्याला अनुवादाचे स्वरूप कशा प्रकारचे आहे याची थोडक्यात कल्पना येते. अनुवाद म्हणजे एका भाषेतील कलाकृती दुसऱ्या भाषेमध्ये नेणे एवढाच अर्थ अभिप्रेत नसून, मूळ कलाकृती ज्या सामाजिक, राजकीय, ऐतिहासिक वातावरणातील आहे. तशा स्वरूपाची रचना जशीच्या तशी करणे असे म्हणावे लागेल. अनुवाद करताना अनुवादकाला त्या कलाकृतीला पूर्णपणे न्याय द्यावा लागतो असे स्वरूप दिसून येते. अनुवादाचे स्वरूप स्पष्ट करताना कल्याण काळे म्हणतात, "अनुवाद ही व्यापक संज्ञा असून भाषांतर ही तिच्यात सामावणारी, तिच्या एक प्रकारचा निर्देश करणारी संज्ञा आहे. त्यात सारांश, विस्तार, स्पष्टीकरण, गद्यरूपांतर, पद्यरूपांतर इ. प्रकार संभवतात पण एक भाषिक अनुवादामध्ये न आढळणारा एक प्रकार भिन्न भाषिक अनुवादामध्ये आढळतो. तो म्हणजे एका भाषेतील संहितेचा अर्थ शब्दशः दुसऱ्या भाषेमध्ये उतरवून प्रतिसंहिता तयार करणे हा होय. याच प्रकाराला रूढ अर्थाने भाषांतर म्हणण्याचा प्रघात आहे."[१२]

अनुवादामध्ये कलाकृतीचा शब्दशः अर्थ देण्याचा प्रयत्न असतोच पण, त्याचबरोबर मूळ कृतीतून मिळणारा सौंदर्यानुभव, वक्तृत्वनुभव इ. शैलीजन्य अनुभवही वाचकांपर्यंत पोहचविण्याच्या कौशल्यापेक्षा तिचा शब्दशः अर्थ दुसऱ्या भाषेत उरवण्याचे कौशल्य अधिक सूक्ष्म प्रकारचे असते. याचाच विचार प्रामुख्याने अनुवादामध्ये केला जातो. अनुवाद वाचताना मूळ कृतीचे स्मरण झाले पाहिजे. मूळ कलाकृतीकडे अकृष्ट झाला पाहिजे, असे स्वरूप अनुवादाचे आहे असेच म्हणावे लागेल.

पद्माकर दादेगावकर यांच्या मते, " भाषांतर म्हणजे भाषिक घटकांची अदला-बदल नव्हे, मराठीच्या जागी इंग्रजी प्रतिशब्द ठेवणे नव्हे तर, मूळ संहितेत कधी उघडपणे तर, कधी सूचकतेने अंतर्हित असलेल्या सांस्कृतिक, सामाजिक आणि तदनुषंगिक इतर ही घटकांची देखील अदला-बदल त्यात अभिप्रेत असते." [१३] यावरून मूळ संहितेची गुणवत्ता तिच्या निर्मितीमागील हेतू, तिच्या विषयीचा आवाका आणि त्यामध्ये वापरण्यात आलेली शैली या घटकांवर प्रामुख्याने अनुवादाचे स्वरूप अवलंबून आहे

असे वाटते.

अरविंद विश्वनाथ हे अनुवादाच्या स्वरूपाबद्दल लिहितात, ''अनुवादाचे स्वरूप हे भाषांतर करणे म्हणजे मूळ अनुभवात इतरांना देखील सामील करून घेणे, त्यामुळे एखाद्या साहित्यकृतीचे मूळ भाषेपेक्षा वेगवेगळ्या भाषेत भाषांतर केले. तर दुर्दैवाने ज्यांना भाषेच्या मर्यादेमुळे त्या साहित्यकृतीच्या सौंदर्यानुभवापासून आणि रसास्वादापासून वंचित रहावे लागते त्यांनाही त्यात सहभागी करून घेता येते. त्यासाठी भाषांतरकर्त्यांने आपल्या क्षमतेनुसार, आपल्या आकलनानुसार दुसऱ्या भाषेच्या वाचकांना मूळ अनुभवाच्या जास्तीत - जास्त जवळ आणण्याचा मूळ संहितेतील भावना किंवा विचारांची तीव्रता आणि विश्वात्मकतेचा प्रयत्न देण्याचा प्रामाणिक प्रयत्न करावा भाषांतरातून दुसऱ्या भाषेतील वाचकांना मूळ संहितेते सध्याह्त असलेल्या वैश्विक तत्त्वांचा प्रयत्न यायलाच हवा या वैश्विकतेचा प्रयत्न देण्यात जे भाषांतर यशस्वी ठरते तेच भाषांतर जिवंत म्हणता येईल.''[१४] म्हणजेच कलाकृतीचा अनुवाद करताना अनुवादकाला दोन स्तरातून जावे लागते. असे त्यांनी स्पष्ट केले आहे.

एकोणिसाव्या शतकात भारतामध्ये मुद्रण कला अस्तित्वात आली. नियतकालिकांची निर्मिती होऊ लागली या सर्वांचा अनुवाद प्रक्रियेवर प्रभाव पडलेला दिसून येतो. मराठी वाङ्मयामध्ये अनुवादाचा अभ्यास विष्णूशास्त्री चिपळूणकर, श्री. म. माटे, डॉ. श्री. व्यं. केतकर, भालचंद्र नेमाडे, दिलीप चित्रे इ. आणि अलिकडच्या काळात सदा कऱ्हाडे, कल्याण काळे, अंजली सोमण यासारख्या विचारवंतांनी केलेला आहे.

मूळ कलाकृतीला धक्का न लावता तिचा धाट न बदलता लक्ष्यभाषेत अगदी स्वाभाविक वाटावी अशी अनुवादाची रचना असावी. कलाकृतीतील भावना, अर्थ, विचार, सामाजिक, सांस्कृतिक, संदर्भ, शैली यामध्ये सहजता असणे आवश्यक आहे. या सर्व विवेचनावरून आपणाला अनुवादाचे स्वरूप ध्यानात येते.

## अनुवादाची परंपरा

मराठी वाङ्मयामध्ये अनुवादाची परंपरा ज्ञानेश्वराइतकीच प्राचीन आहे. रामायण, महाभारत, गीता, भागवत, पुराणे हे प्राचीन काळापासून आजपर्यंत साहित्याचा किंवा अनुवादाचा पाया बनले आहेत. ज्ञानेश्वर, मोरोपंत, मुक्तेश्वर, वामन पंडित यांच्यापासून ही अनुवादाची परंपरा रूढ झालेली पहावयास मिळते. संस्कृत आणि इंग्रजी या दोन्ही भाषेमुळे मराठीत अनुवादाची परंपरा अधिक रूढ झाली आहे. मराठी साहित्यामध्ये अनुवादाच्या संदर्भात नियतकालिकांचे कार्य फार मोलाचे आहे. त्याचबरोबर वर्तमानपत्रे, त्यांच्या पुरवण्या, साप्ताहिके, पाक्षिके, मासिके यांनीही अनुवादाच्या बाबतीत महत्त्वाची कार्ये केली आहेत. स्फुट साहित्याची भाषांतरे या सर्वांमधूनच प्रकाशित होत होती.

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात अर्वाचीन मराठी गद्याची जडण-घडण होत होती. त्यामध्ये अनुवादित वाङ्मयाचे श्रेय खूप आहे. अनेक गोष्टी, चरित्रे, कादंबऱ्या निबंधमाला पूर्व काळात अनुवादित होत असल्याने याला वाङ्मयइतिहासकारांनी 'तमोयुग', 'भाषांतर युग' म्हटले आहे. १८०० ते १८७४ या कालखंडामध्ये इंग्रजी राजवटीच्या आगमनाने अनेक सामाजिक, सांस्कृतिक, साहित्यिक क्षेत्रामध्ये स्थित्यंतरे झाली म्हणूनच या कालखंडाला 'अव्वल इंग्रजी कालखंड' असेही संबोधले जाते. चंद्रकांत बांदिवडेकर यांच्या मते, "१९२० पर्यंत अनेक सरस व सुरस वाङ्मयमाला प्रकाशित होत होत्या. त्यामध्ये 'महाराष्ट्र कुटुंबमाला', 'सरस वाङ्मय रत्नमाला', 'सूरस ग्रंथमाला', 'ललित वाङ्मय रत्नमाला', 'आधुनिक कादंबरीमाला', 'राष्ट्रीय कादंबरीमाला', 'ज्ञानमित्र पुस्तकमाला', 'तरूण साहित्यमाला', 'महिला विजय ग्रंथमाला', 'महाराष्ट्र साहित्य सेवक ग्रंथमाला' इ. १९२० ते १९४७ या काळातही त्या पैकी अनेक चालू होत्या. या मालांचा उद्देश मनोरंजन करणे आणि मनोरंजन करता करता नित्युपदेश देणे, राष्ट्रीय भावना वाढीस लागणे, संस्कार घडवणे, जगाचे ज्ञान देणे, शीलसंवर्धन करणे असे अनेक होते. आणि जगातील वाङ्मयाच्या वाचनाने हे सर्व घडेल अशी, धंदेवाईक अशा संपादकांना होती...... या मालांमधून पाश्चात्त्या कादंबऱ्यांचे अनुवाद, भावानुवाद प्रकाशित होत होते?"[११] अशा प्रकारची समृद्ध परंपरा

अनुवादित साहित्याला लाभलेली आहे.

आज बरेच लेखक इतर भाषेतील साहित्याचा अनुवाद करीत आहेत, हे प्रत्ययाला येते. भारतीय भाषांच्या संदर्भात अनुवादाची परंपरा तुलनात्मक दृष्ट्या जास्त आहे, असे म्हणावे लागते. सांस्कृतिक एकतेमुळे भारतीय भाषांच्या संदर्भात अस्सल अनुवादाची परंपरा निर्माण झाली ती ह. ना. आपटे, भा. वि. वरेरकर, बंकीमचंद्र व शरच्चंद्र यांच्या अनुवादापासून ते आजपर्यंत ही अनुवादाची परंपरा समृद्ध झालेली दिसते. १९२० नंतर मात्र अनुवादित साहित्याची कक्षा रूंदावलेली दिसते, हे स्पष्ट होते.

**अनुवाद : शास्त्र की कला**

अलीकडच्या कालखंडामध्ये अनुवाद शास्त्र आहे की कला असा प्रश्न उपस्थित होताना दिसून येतो. पण अनुवाद हे जितके शास्त्र आहे तितकेच कलाही आहे असेच म्हणावे लागेल.

ध्वनी, शब्द, वाक्य यांचे सैद्धांतिक विवेचन अनुवादामध्ये आलेले असते. एखाद्या भाषेला समतुल्य असे दुसऱ्या भाषेतील घटक निवडताना सैद्धांतिक ज्ञानाचा आधार घ्यावा लागतो. पण भाषांतर करताना या सैद्धांतिक नियमांचे काटेकोर पालन करता येणे अशक्य असते. अनेक ठिकाणी त्याचे नियमोल्लंघन होत असते. आणि या सैद्धांतिक नियमांचे नियमोल्लंघन झाले की अनुवाद कलेकडे झुकतो. तर अनुवाद हे शास्त्र मानले तर दोन भिन्न व्यक्तींनी केलेल्या कथ्याच्या अनुवादात फरक पडायला नको पण तसे होत नाही. प्रत्येक लेखकांची शैली वेगळी असते. म्हणजेच अनुवादाची पार्श्वभूमी शास्त्र असले तरी प्रत्यक्षात मात्र अनुवाद कलेत मोडतो. आणि भाषांतर ही कला असली तरी ती अनुवादकाला आत्मसात करावी लागते.

कल्याण काळे यांच्या मते, ''भाषांतर हे भाषेचे प्रगत कौशल्य आहे. ते सरावाने, अनुभवाने व प्रामाणिकपणे साध्य होऊ शकते. पण शास्त्रीय घटिता प्रमाणे त्याचा पडताळा पाहता येत नाही. शास्त्र म्हणजे तंत्र याही अर्थाने भाषांतर हे शास्त्र होऊ शकत

नाही. कारण भाषांतराचे तंत्र नसते, कारण भाषांतरकर्त्यांच्या दोन्ही भाषांवरील प्रभुत्वानुसार जमेल तसे भाषांतर करत असतो''[१५] म्हणजेच अनुवादाकांचे प्रभुत्व हे दोन्ही भाषेवर सारखेच असेलच असे नाही. प्रत्येकाच्या क्षमतेनुसार, कौशल्यानुसार अनुवाद होत असेल तर अनुवादाला शास्त्र म्हणण्याऐवजी कला म्हणणे अधिक योग्य होईल. कला ही उत्स्फूर्त ज्ञानावर अवलंबून असते तर, त्याला व्यासंगाची जोड द्यावी लागले. त्यामुळे अनुवादाला शास्त्र म्हणता येणार नाही. याला कला म्हणनेच अधिक रास्त ठरेल.

## अनुवादाची भूमिका

अनुवादाच्या प्रक्रियेत अनुवादाकाची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. अनुवाद हा एकाचवेळी वेगवेगळ्या पातळ्यांवर कार्यरत असतो. तो एकाच वेळी वाचक आणि लेखक अशा दोन भूमिका निभावत असतो. अनुवादक हा मूळ साहित्यकृतीचा वाचक असतो तर अनुवादित साहित्यकृतीचा तो लेखक असतो. म्हणजेच अनुवादक हा दोन व्यवस्थांमध्ये वावरत असतो. अनुवादकाला कलाकृतीच्या मूळ अर्थाला समजून होऊन पुन:ग्रथित करावे लागते. मूळ साहित्यकृती काळ व अवकाश यांच्या कोणत्या अक्षावरती आहे. याचे भान अनुवादकाला असने गरजेचे असते.

अनुवादक हा एकाचवेळी दोन समाजामध्ये, दोन संस्कृतीमध्ये, दोन भाषांमध्ये मध्यस्थाची भूमिका करत असतो. अनुवादकाचा दोन्ही भाषांशी आणि समाजाशी अगदी जवळचा संबंध असलेला पहावयास मिळतो. त्यामध्ये अनुवादकाची एक मातृभाषा असते तर, दुसरी त्याची परभाषा असते. या भूमिकेतूनच त्याला मूळ साहित्यकृतीचा अनुवाद करताना साहित्यकृतीची नेमकी लय, नेमके शब्द व शब्दप्रयोग शोधण्यासाठी अत्यंत धडपड करावी लागते. आणि हीच खरी अनुवादकाची कसोटी ठरते.

अनुवादाच्या भूमिकेविषयी श्रीरंग संगोराम म्हणतात,'' भाषांतरकाराची त्या त्या साहित्य प्रकारावरील पकड व तत्संबंधित अनुभव, त्याचा प्रामाणिकपणा, तळमळ,

स्रोत, लक्ष्य भाषेवरील त्याचा अभ्यास जटिल प्रभुत्व आणि सर्वकष बांधिलकी व कार्यानुराग हाच यशस्वी भाषांतरकाराचा 'धर्मपथ' आहे.''[१६] म्हणजेच भाषांतर करताना अनुवादाचा सूर बिघडू नये याची जबाबदारी अनुवादकाला घ्यावी लागते. मूळ लेखकाने काय म्हटले आहे त्याच्यापेक्षा त्यातून त्या लेखकाला काय म्हणायचे आहे याचे अनुवादकाला भान असणे गरजेचे आहे.

मूळ कलाकृती कोणत्या सांस्कृतिक पिंडातून घडली आहे, त्याची पूर्ण ओळख असने अनुवादक र्त्याला फार आवश्यक असते. मूळ भाषेच्या काही लकबी कायम ठेवून ज्या भाषेत अनुवाद करावयाचा आहे तिचाही विचार करावा लागतो. या संदर्भात व. दि. कुलकर्णी याचे मत लक्षणीय ठरते. त्यांच्या मते, ''अनुवादाच्या सामर्थ्य मर्यादा ध्यानी होऊन ही अधिकाधिक मूळास धरून, पण मूळ काव्यसौंदर्यास हानी न पोहचविता ते विकसवून अनुवाद करण्याचं कौशल्य अनुवादकाजवळ असावं लागतं.''[१७] अनुवादित साहित्यकृती वाचताना त्या साहित्यकृतीचा प्रभाव वाचकाला जाणवला पाहिजे.

सदा कऱ्हाडे यांच्या विवेचनानुसार, ''प्रथम भाषांतरकाराला अथवा अनुवादकाला स्त्रोत्र भाषेतील सामग्रीचा अर्थ पूर्णत: ग्रहण करता आला पाहिजे. भारतीय साहित्यशास्त्रानुसार वाच्यार्थ, लक्ष्यार्थ आणि व्यंग्यार्थ हे ग्रहण करता आले पाहिजेत. तसेच पाश्चात्त्या साहित्य शास्त्रानुसार भाषिक अर्थ (Liguistic Meaning), कोशगत अर्थ (Referential Meaning), आणि भावात्मक अर्थ (Emoitive Meaning) ग्रहण करता आले पाहिजे.''[१८]

यावरून असे दिसून येते की, अनुवादकाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. एक विचार एका भाषेतून दुसऱ्या भाषेत पोहचविण्याचे कार्य अनुवादक करत असतो. त्यावेळी अनुवादकाजवळ विशिष्ट प्रकारची संवेदनशीलता, संवेदनक्षमता याची गरज असते. कलाकृतीचा अनुवाद करताना अनुवादकाला भाषेचेच नव्हे तर संस्कृतीची ही जाण असणे गरजेचे आहे. म्हणजेच अनुवाद हा प्रथम श्रेणीचा आस्वादक असायला हवा, काव्यमर्मज्ञ असावा, कवी मनोवृत्तीचा हवा, दोन्ही भाषांचा आणि त्या भाषेतील काव्यरूप अविष्काराचा उच्चतम प्रतिभा जाणकार असायला हवा. अशा प्रकारची

अनुवादकाची अनुवाद करता वेळी भूमिका असणे गरजेचे असते.

## अनुवादाचे महत्त्व

एकोणिसाव्या शतकामध्ये अनुवादाचे महत्त्व वाढलेले आहे हे स्पष्ट होते. पाश्चात्त्या साहित्य आधाराला घेऊन मराठीमध्ये कथा, कविता, नाटक, कादंबरी या सारख्या साहित्यकृती अनुवादित झाल्या आहेत. त्यामुळे पाश्चिमात्त्या देशातील आचार-विचार, चालीरीतींचा, वाचकांना अप्रत्यक्षपणे परिचय घडून येऊ लागला. त्या बरोबरच अनुवादित रचनांना महत्त्व येऊ लागले. कादंबरी या वाङ्मयप्रकारामध्ये अनुवादाचे वाढते प्रमाण आहे असे दिसून येते. त्यामुळे दोन समाजामध्ये, संस्कृतीमध्ये, भाषेमध्ये जवळिकता निर्माण झाली आहे, हे स्पष्ट होते.

प्रारंभीच्या काळामध्ये संपूर्ण जगभरातील प्रसिद्ध भाषांतील वाङ्मयकृतीचे सरस अनुवाद करून, मराठी वाङ्मयाचे दालन समृद्ध करणे हा हेतू असलेला दिसून येतो. यामुळे वाचकाची  दृष्टी व्यापक होण्यास मदत झाली आहे. मूळ कलाकृतीचे अनुवादित कृतीमध्ये त्याचे सौंदर्य तंतोतंत आणता येणे शक्य नसले तरी, मुळ लेखकाचा जीवनविषयक दृष्टिकोन, तत्त्वज्ञान, मनुष्य स्वभाव विषयीचे निरिक्षण हे सर्व त्यामध्ये पहावयास मिळते.

या सर्व गोष्टीचा विचार करता अनुवादाला प्राप्त झालेले महत्त्व स्पष्ट होते. अनुवादाला अनेक वाङ्मय प्रकारांनी महत्त्व प्राप्त करून दिले आहे, हे मराठीमध्ये अनुवादित झालेल्या साहित्यावरून दिसून येते.

## कांदबरीची संकल्पना

मराठी साहित्यामध्ये इतर वाङ्मय प्रकारांच्या तुलनेत 'कादंबरी' या प्रकाराने साहित्याच्या कक्षा रूंदावल्या आहेत. त्यामध्ये अनुवादित कांदबरीने मोलाची कामगिरी केली आहे. अनुवादित कादंबरीचा अभ्यास करताना सर्वप्रथम अनुवादित कादंबरीची संकल्पना स्पष्ट होणे गरजेचे आहे.

कादंबरी हा वाङ्मयप्रकार सुरवातीपासूनच लौकिक जगाशी, वास्तवाशी निगडित झालेला आहे. कादंबरीत व्यक्त झालेले कथानक हे वास्तव जीवनाशी संबंधित नसले तरी, त्यातील व्यक्ती, घटना खऱ्या नसल्या तरी, त्यामध्ये काहीतरी सत्य असावे अशी वाचकांची अपेक्षा असते. कादंबरीमध्ये विशिष्ट भाषिक, समाज आढळून येतो. त्यामुळे त्या समाजाची संस्कृती, मूल्ये, मानवसमूहांच्या आकांक्षा त्यांची अवनतावस्था व अर्जितावस्था यांचे चित्रण असले पाहिजे, असे गृहित धरले जाते.

कादंबरी ही विशिष्ट संज्ञा ज्या वाङ्मय प्रकाराला लावली जाते तो मात्र पाश्चात्त्या वाङ्मयामध्ये सतराव्या - अठराव्या शतकात व मराठी मध्ये एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात निर्माण झाली असे मानले जाते. संस्कृत कवी बाणभट्ट याने लिहिलेल्या 'कादंबरी' या नावाच्या अद्भुताने नटलेल्या प्रणयरम्य गद्य कथेच्या नायिकेचे नाव कादंबरी होते. तेच नाव बाणभट्टाने कथेला दिले. 'नॉव्हेल' या शब्दाला 'कादंबरी' हा शब्द असावा हे स्पष्ट होते.

मराठी वाङ्मयामध्ये कादंबरी लेखनाचा प्रारंभ म्हणजे पाश्चात्त्या साहित्याचा परिणाम म्हणावा लागेल. इंग्रजी राजवटीने देशात अनेक बदल घडवून आणले. या परिवर्तनाचा सर्वात मोठा बदल भारतीय साहित्यावर झालेला दिसून येतो. कुसुमावती देशपांडे यांच्या मते, "कादंबरी वाङ्मयाला लागणारी सामग्री पूर्व काळातही मराठी वाङ्मयात विखुरलेली होती. परंतु प्रत्यक्ष कादंबरीचा उगम मात्र अव्वल इंग्रजी मध्ये व इंग्रजी वाङ्मयाच्या संस्कारामुळे, अनुकरणामुळे झाला."[१९]

कादंबरी रूपाची तत्त्वे साहित्याशी जोडताना, साहित्य प्रकार हे देशकालातीत असतात. तसेच ते देशकाल निष्ठाही असतात याचे भान ठेवावे लागते. म्हणजेच कादंबरी हा साहित्यप्रकार जरी इंग्रजीच्या संयोगाने आला असला तरी एक रचना प्रकार म्हणून हिंदुस्थानात नवा नाही, हे लक्षात घेतले पाहिजे. भालचंद्र नेमाडे कादंबरीची संकल्पना स्पष्ट करताना म्हणतात, "हा एक गद्य रचना प्रकार आहे. ही बाजूही लक्षात घेतली पाहिजे लीळाचरित्र, स्मृतीस्थळ, बखरी, महिपतिकृत चरित्रे इ. रचना प्रकार कांदबरीकारांनी अनुकरणाने रूढ केली तिच कादंबरी"[२०] म्हणेजेच कादंबरी जशी

सुरुवातीपासून मराठीत आली तशीच मराठी लेखकांनी स्वीकारली आहे याची कल्पना येते.

मराठी कादंबरी लेखनात अनुवादित कादंबरीची संकल्पना चांगल्या पद्धतीने रूढ झालेली दिसते. अनुवादित कादंबरीवर आपआपल्या आवडीनुसार मराठीने साज चढवलेला आहे. त्या सदंर्भात चंद्रकांत बांदिवडेकर म्हणतात, ''कादंबरी हा वाङ्मय प्रकार इतका लवचिक प्रसरणशील आणि सर्वसमावेशक वाङ्मय प्रकार आहे. की त्याचे स्वरूप सांगता आले (हे स्वरूपही प्रत्येकाच्या दृष्टिकोनाप्रमाणे वेगवेगळे असू शकेल ) तरी व्यवच्छेदक लक्षणांनी त्यांच्या सीमारेषा निश्चित करणे कठीण आहे.''[२१]

कादंबरी या वाङ्मयप्रकाराने मराठी साहित्यामध्ये स्वतःचे असे स्वतंत्र दालन निर्माण केले आहे. कादंबरी हा वाङ्मयप्रकार सर्व वाङ्मय प्रकारांच्या तुलनेत समृद्ध झालेला वाङ्मय प्रकार म्हणून ओळखला जातो. 'कादंबरी' ही संकल्पना व्याख्यांच्या आधारे नेमकेपणाने समजून येईल त्यातील काही निवडक व्याख्या पुढीलप्रमाणे पाहता येतील.

## कादंबरीच्या व्याख्या

'कादंबरी संकल्पना स्पष्ट करताना कादंबरीच्या व्याख्याच्या आढावा घेणे गरजेचे आहे. सुरुवातीपासूनच 'कादंबरी' चा अर्थ समजून घेण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो, त्या आधारे काही व्याख्या लक्षात घेऊ.

लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी संपादित केलेल्या 'मराठी विश्वकोश' मध्ये पुढील व्याख्या दिली आहे,

''कथानक, व्यक्तिचित्रण लेखकाचा दृष्टिकोन व यांना अनुरूप अशी निवेदन तंत्र, वर्णने, वातावरणनिर्मिती, शैली इ. घटकांनी गद्यात विस्तृतपणे संघटित केलेले वास्तव जीवनाचे चित्रण म्हणजे कादंबरी''[२२]

'मराठी कादंबरी तंत्र आणि विकास' या पुस्तकामध्ये बापट / गोडबोले यांनी कादंबरीची व्याख्या केली ती म्हणजे,

''साहित्य सृष्टीच्या आधाराने काल्पनिक प्रतिसृष्टी निर्माण करून काल्पनिक पात्रांची स्वभावचित्रे व काही अंशी तदावलंम्बित जिवित, घटना यांचे गोष्टरूपाने वर्णन करून व कलानंदाची प्राप्ती करून घटनांच्या गुंतागुंतीच्या प्रश्नावर प्रकाश टाकणारा गद्य वाङ्मय विभाग.''[२३]

भालचंद्र नेमाडे 'टीकास्वयंवर' या मध्ये कादंबरी म्हणजे काय याविषयी लिहितात,

''कादंबरी म्हणजे प्रदीर्घ भाषिक अवकाश असलेली, आशयसूत्राचे अनेक पदर असलेली, त्यामुळे विस्तृत संरचना मांडणारी, अनेक पात्रे, प्रसंग अपूर्णतेपेक्षा संपूर्णतेकडे जास्त झुकलेली आहेत. अशी कलाकृती असते .......सामाजिक आशय विशाल असावा लागतो. एखाद्या समस्येचा पाठपुरावा तिच्या विविध संदर्भासकट मांडलेला असतो. एखाद्या पोट समूहाचे, पोट संस्कृतीचे, तपशीलासह दर्शन घडविलेले असते. संपूर्ण काळाचा किंवा समाजाचा छंद घेतलेला असतो. आशयसूत्रे बळकट असतात. पात्रे सलग उभी राहतात.''[२४]

प्रभा गणोरकर व इतर यांनी संपादित केलेल्या 'वाङ्मयीन संज्ञा संकल्पना कोश' मध्ये कॅथरीन लीव्हर लिहितो,

''कादंबरी म्हणजे कथात्मक लिखित गद्याचा बऱ्यापैकी म्हणता येईल असा लेखकाने निर्मिलेल्या नव्या आणि कल्पित वास्तवात वाचकाला गुंततवून टाकणारा रचनाबंध होय.''[२५]

'कादंबरी' हा लवचिक व सर्वसमावेशक साहित्यप्रकार असल्याने तिची सर्वसमावेशक व परिपूर्ण व्याख्या करणे कठीण आहे. कादंबरी या घटकामध्ये मानवी जीवनाचा विशाल पट लेखकाने साकार केलेला असतो. घटना, प्रसंग, समस्या यांचा कादंबरीमध्ये परामर्श घेतलेला असतो. भावनिक, मानसिक, सांस्कृतिक, मनोविश्लेषनात्मक अशा विविध पातळ्यावर वावरणाऱ्या मानवाचे चित्रण कादंबरीत आलेले पहावयास मिळते.

## मराठी अनुवादित कादंबरीची वाटचाल

मराठी साहित्यामध्ये कादंबरी या वाङ्मयप्रकारची सुरूवात अनुवादाने झाली आहे. अनुवादित कादंबऱ्या त्याच्या मधूनच उत्तमरीतीने मराठी कादंबरी अस्तित्वात आली. सुरूवातीच्या काळामध्ये बहुतांश इंग्रजी कादंबऱ्यांचे मराठीमध्ये अनुवाद झाले आहेत. १८४१ मध्ये जॉन बन्याय यांच्या 'पिलग्रिम्स प्रोग्रेस' चे मराठीमध्ये 'यांत्रिक क्रमण' या नावाने हरी केशवजी यांनी अनुवाद केला. आणि अनुवादित कादंबरीचा पाया घातला. पण खऱ्या अर्थाने मराठीतील स्वतंत्र कादंबरी लेखनास प्रारंभ हा १८५७ च्या सुमारास झाला. मराठीतील पहिल्या अनुवादित कादंबरीचा मान हरी केशवजी यांना मिळाला असला तरी, मराठीतील पहिल्या कादंबरीचा मान हा बाबा पद्मनजी यांच्या 'यमुना पर्यटन' या कादंबरीला मिळाला. मराठी कादंबरीची वाटचाल भाषांतरित, काल्पनिक पुढे ऐतिहासिक आणि शेवटी सामाजिक अशा क्रमाने झाली आहे.

१८०० - १८७४ या कालखंडामध्ये बरिच भाषांतरे झाली 'अरबी भाषेतील सुरस व चमत्कारिक गोष्टी' (१८६१) यांनी मराठी वाचकाला अद्भुत किंवा भडक प्रसगांनी भरलेल्या कथांची गोडी लावली. कृष्णशास्त्री चिपळूणकर 'रासेलसचे भाषांतर' (१८७३) या सारख्या प्रबोधन प्रधान कादंबऱ्याही मराठीत आल्या आहेत. 'निलब्लास चरित्र', 'चरित्रवजा गोष्टी यांची भाषांतरे', 'एलिझाबेथ अथवा सैबेरिया देशातील हद्दपार झालेली कुटुंब' (१८७४), 'पाल आणि व्हर्जिनिया (१८७५) ही भाषांतरे त्या काळी लोकप्रिय ठरली आहेत.

१८९० - १९०० या काळात रेनॉल्डसच्या अनेक कादंबऱ्यांची भाषांतरे रूपांतरे झाली. त्यांच्या कादंबरीपैकी 'मिस्टरीज ऑफ दि कोर्ट ऑफ लंडन' ही कादंबरी ही अनुवादाच्या दृष्टिने महत्त्वाची मानली जाते. ह. ना. आपटे यांनी 'मधली स्थिती' या कादंबरीला याच कादंबरीचा आधार घेतलेला आहे.

१९२० ते १९५० या कालखंडामध्ये अनुवादाचे प्रयोजन बदललेले दिसते. अनुवादित कादंबरीकारांचा आणि अनुवादित साहित्याचा वाचकवर्ग चांगला निर्माण झाला होता. इंग्रजी, रशिया, फ्रेंच, जर्मन भाषेतील साहित्य वाचले जात होते. या

कालखंडामध्ये इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, रशियन, इटालियन, पोर्तुगीज, संस्कृत, बंगाली, हिंदी, गुजराती, उर्दू, इस्त्राईल, कन्नड अशा भाषातील कादंबऱ्याचे मराठीत सरस अनुवाद झालेले आहेत.

'इंग्रजी' भाषेतून मराठीमध्ये अनुवादित झालेल्या साहित्यामध्ये विपुलता दिसून येते. पाश्चात्त्य कादंबऱ्यांचे अनुवाद मराठी साहित्यामध्ये होत होते. ते अनुवाद ग्रंथमालामधून क्रमशः प्रसिद्ध होत असत. १९९० पर्यंत रेनॉल्डसची अनेक भाषांतरे झाली होती. मेरी कॉरेली यांच्या शैलीने वाचकांना चांगली ओढ लागली होती. याच काळात काही प्रमाणात रूपांतरित कादंबऱ्याचेही प्रमाण वाढलेले दिसून येते. हॉलकेन यांच्या 'इटर्नल सिटी' या सिनेमाच्या आधारे द. त्र्य. अठवले यांनी 'विसाव्या शतकातील हिंदुस्थान' (१९३७) ही कादंबरी लिहिली. विल्की कॅलिन्स यांनी 'दि मून स्टोन' या कादंबरीचे चिदंबर साने यांनी 'चंद्रकांत' नावाने अनुवाद केला, 'दु वुमन हू डिड' या कादंबरीचे इंदिरा सहस्त्रबुद्धे यांनी 'केवळ ध्येयासाठी' (१९२४) या नावाने मराठीत आणली.

देवदत्त नारायण टिळक यांनी चार्लीटी एम यंगेच्या 'द लिटल ड्युक उर्फ रिचर्ड फियरलेस' याचा १९२७ मध्ये संक्षिप्त अनुवाद प्रसिद्ध केला. ना. सी. फडके यांनी विल्यम सारोयान याच्या 'हुमन कॉमेडींचा' 'जीवन संगीत' हा उत्कृष्ट अनुवाद केला. ना. सी. फडके यांच्या कादंबरी विषयी बांदिवडेकर म्हणतात, ''लेखकावर अन्याय न होईल व रोचकता वाढेल अशा बेताने अनुवादकाने कटछाट केली आहे. पण भारतीय पेहराव न चढताही कादंबरी कशी सुंदर अनुवादावी याचा वस्तुपाठ ही कादंबरी देते.''[२६]

याशिवाय लक्ष्मण परळकर, विश्वनाथा श्रोत्रिय, सुशील परभृत, बाबुराव कांचनकोटी, नरहर अठवले, हरिभाऊ मराठे, ग. कृ. जोशी अशा मराठी लेखकांनी अनुवादित कादंबरीच्या माध्यमातून मराठी कादंबरी समृद्ध केली आहे. अनुवादित कादंबरीचा हेतू सांगताना बांदिवडेकर यांचे विवेचन महत्त्वाचे ठरते, ''भारतीय संस्कृतीची तत्त्वे पाश्चात्त्य वाङ्मयातून व्यक्त होताना दिसतात. तेव्हा भारतीय भूमिची सेवा वाङ्मयाच्याद्वारे करण्याच्या इच्छेने वाङ्मयप्रेमी लेखक भाषांतरास प्रवृत्त होतात

असे दिसते. हेतू हा की भारतीयांनी वेळीच सावध होऊन आपल्या संस्कृतीचे जतन करावे.''[२७] अशा प्रकारे महत्त्वाच्या इंग्रजीच्या कादंबऱ्याचे मराठीमध्ये अनुवाद झालेले पहावयास मिळतात.

इंग्रजी साहित्याच्या माध्यमातून अनेक लेखकांनी 'फ्रेंच' कादंबरीचे अनुवाद केले आहेत. अलेक्झांडर डयूमा यांच्या कादंबरीवरील य. पा. महेंदळे यांची 'फ्रेंच रजासत्तेवर दृष्टी' (१९३१) 'भिषण भवितव्यता' (१९३२) हे त्यांच्याच कादंबरीचे अनुवाद आहेत. एमिला झोला यांच्या 'द अ‍ॅटॅक ऑन द मिल' चा अनुवाद 'अभागिनी' असा ना. रा. अंबीकर यांनी केला.

'जर्मन' भाषेतील उत्तम कलाकृतीचे मराठीमध्ये अनुवाद झालेले दिसतात. लुईने कोप्पीन यांची कादंबरी स. बा. हुदळीकर यांनी 'बूबी' (१९२७) मध्ये तर, स्टीफॅन त्स्वाईन यांच्या इंग्रजीत अनुवादलेल्या कादंबरीवरून मराठीत न. का. घाटपूरे, कवी यशवंत, कवी बा. भ. बोरकर, ना. सी. फडके यांनी सरसतेने अनुवाद केले आहेत.

'रशियन' भाषेतील कादंबरी मराठी मध्ये रूळलेल्या दिसतात. गोर्कीच्या 'मदर' या कादंबरीचा स. ह. मोडक यांनी 'आई' नावाने केला. टॉलस्टॉय यांची कथा 'क्राइट्सर सोनान' याचा अनुवाद भाऊसाहेब मंत्री यांनी 'जारिणी' (१९४४) नावाने केला.

याशिवाय पाश्चात्त्य देशातील 'इटालियन', 'पोर्तुगीज' यासारख्या भाषातून मराठीमध्ये व्यंकटेश वकील, व्यंकटेश अ. पै. रायकर, स. ह. मोडक, यांनी इंग्रजी भाषेच्या आधारे उत्तम प्रतिचे अनुवाद केलेले आढळतात.

'संस्कृत' कादंबरीच्या अनुवाद अगदी अल्प प्रमाणात दिसून येतो. बाणभट्टाच्या कादंबरीचा १९२९ मध्ये श्री. शं. नवरे यांनी 'कादंबरी कथा' नावाने केला आहे.

भारतीय भाषेतील 'बंगाली' या भाषेतील साहित्य मराठीमध्ये आलेले दिसते. वि. स. गुर्जर, वा. रो. आपटे, वरेरकर या सारख्या लेखकांनी बंगाली कादंबरी मराठीत आणली. बंकिमचंद्र, रवीन्द्रनाथ व शरचंद्र यांचे अनुवाद महत्त्वाचे ठरलेले आहेत. वा. गो. आपटे यांनी 'संपूर्ण बंकिमचंद्र' चार खंडात (१९२३-२४) प्रसिद्ध केला.

रवीन्द्रनाथ टागोरांच्या A story of four chapters या इंग्रजी पुस्तकावरून शि. गो. भावे यांनी अनुवाद केला. उपेद्रनाथ गांगुली, काली प्रसन्न, दासगुप्त, रमेशचंद्र दत्त, मनिषचंद्र चटोपाध्याय, हरिसायन मुखोपाध्याय, सुरेंद्र मोहन भट्टाचार्य यांच्या महत्त्वपूर्ण कादंबऱ्या मराठीत आल्या आहेत.

'हिंदी' साहित्यही मराठीत आलेले आहे. प्रेमचंद्र यांच्या 'कथाकल्प' याचा अनुवाद शं. बा. शास्त्री यांनी केला. जैनेद्रकुमार यांच्या 'त्यागपत्र' चा अ. म. जोशी यांनी अनुवाद केला. यशपाल, भगवती चरणवर्मा यांच्या कांदबऱ्या मराठीत अनुवादित झाल्या आहेत.

'गुजराती' मधून रमणलाला देसाई, कन्हैयालाल मुन्शी, राम नारायण पाठक यांच्या कादंबरी लेखनाचे अनुवाद रत्नप्रभा रणदिवे, ल. रा. भिडे, शं. वा. कुलकर्णी यांनी केले आहेत.

त्याचबरोबर भारतीय भाषेतील 'उर्दू', 'तमीळ', 'तेलगू', ' मल्याळम्' यासारख्या भाषेतील कादंबरी लेखन थोड्याफार प्रमाणावर मराठीत आले आहे.

'कन्नड' साहित्य आणि मराठी साहित्य व भाषा यांचा संबंध अत्यंत जवळचा आहे. मराठी भाषेमध्ये कन्नड साहित्य चांगलेच रूळलेले दिसून येते. कलाकृतीचे बहुतांश अनुवाद झालेले पहावयास मिळतात. शिवराम कारंतापासून ते एस. एल. भैरप्पा यांच्या पर्यंत प्रभावी ठरलेल्या कन्नड साहित्याचे मराठी अनुवाद झाले आहेत. कन्नड अनुवादाची परंपरा प्राचीन काळापासून असलेले दिसते. कारंत, मस्ती, अनंतमूर्ती, कर्नाड या सारख्या लेखकाचे साहित्य मराठीमध्ये सरस पद्धतीने अनुवादित झाले आहे. कन्नड मधील ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त शिवराम कारंत यांच्या चोमन दुडी, धर्मराजाचा वारसा, बेट्टदजीव, कुडीय, मीटल्यानंतर अशा अनेक कादंबऱ्याचे अनुवाद मराठीत झाले आहेत. एम. टी. वासुदेवन यांच्या 'वाडा चिरेबंदी' चा अनुवाद शरचंद्र बडोदेकर यांनी केला. अनादी अनंत (श्रीरंग), बनशंकरी (निरंजन के. दास), गंगाळ्या गंगामाई (मोकाशी शंकर), घर (टी. जी. जाधव) या कादंबऱ्यांचे शंकुतला बोरगावकर, मीरा शीदाली, श्यामलता शिरोळकर, अनुपमा उंबळ, उमा कुलकर्णी यांनी अनुवाद केले

आहेत.

अलीकडच्या काळातील कन्नड साहित्यिक एस. एल. भैरप्पा यांच्या आजवर 'पर्व', 'जा ओलांडूनी', 'परिशोध', 'वंशवृक्ष', 'तंतू' या कादंबऱ्याचे अनुवाद उमा कुलकर्णी यांनी केले आहेत. त्यांच्या 'पर्व' या कादंबरीचा अभ्यास या ठिकाणी केला जाणार आहे.

### अनुवादीत कादंबरी : 'पर्व'

एस. एल. भैरप्पा यांची कन्नड साहित्यात लक्षणीय ठरलेली 'पर्व' ही कादंबरी महत्त्वाची मानली जाते. कन्नड साहित्यामध्ये साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त झालेले भैरप्पा यांनी आजवर बरेच लेखन केले आहे. त्यांच्या कादंबरी लेखनाचे अनेक भाषांत अनुवाद झाले आहेत. 'पर्व' ही कादंबरी कन्नड मधून मराठीत अनुवादित करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य उमा कुलकर्णी यांनी केले आहे.

महाभारता सारखा विषय हा प्रत्येक साहित्यिकाला वेळोवेळी आव्हान देणारा ठरला आहे. अशा या महाभारतावर आधारित असलेली 'पर्व' ही कादंबरी आशयाच्या आणि विषयाच्या दृष्टिने लक्षणीय ठरली आहे. महाभारत हे भारतीय मनास व्यापून उरणाऱ्या कथासूत्रावर अधारित आहे. भैरप्पाची 'पर्व' ही कादंबरी पौराणिकतेहून ऐतिहासिकतेत आणि ऐतिहासिकतेतून समकालीन वास्तवात संक्रमण करण्याच्या धाडसी प्रयत्न भैरप्पांनी केला आहे. समकालीन सामाजिक आशय महाभारतातील व्यक्तिरेखांच्या आधारे स्पष्ट केला आहे. सुरुवातीपासून शेवटपर्यंत महाकाय असणाऱ्या या कादंबरीमध्ये युद्धाची भीषणता तिव्रतेने जाणवून येते.

रूढ मिथकांना झुगारून देण्याचे काम भैरप्पांनी केले आहे. वास्तवाला सूक्ष्मपणे कवेत घेत त्यांनी हळूवारपणे महाभारताचे आशयसूत्र उलगडले आहे. मूळ कथाच इतकी गुंतागुंतीची
आहे की 'पर्व' मध्ये त्याची छाया आपल्याला प्रखरतेने जाणवते. तत्कालीन समाज वास्तवाच्या संदर्भात सखोल चिंतन, महाभारतातील सूक्ष्म बारकावे, सत्यशोधनाचा

दृष्टिकोन समोर ठेवूनच कादंबरी आकारली आहे. कथासूत्राच्या आधारे येणाऱ्या मिथकांच्या आणि मिथकांच्या वापरातून कादंबरीला प्राप्त झालेले कलात्मक स्वरूप 'पर्व' मध्ये आले आहे. 'पर्व' मधील व्यक्तिरेखा सामान्य पातळीवर रेखाटण्याचा प्रयत्न भैरप्पांनी केला आहे. वाचकांच्या मनावर ठसा उमटविणारी 'पर्व' ही कादंबरी कन्नड साहित्यामध्ये आणि मराठी साहित्यामध्ये लक्षणीय ठरली आहे. याचा सखोल अभ्यास प्रस्तुत लघुप्रबंधामध्ये केला जाणार आहे.

**समारोपः-**

प्रस्तुत प्रकरणात केलेल्या विवेचनावरून असे जाणवते की, अनुवादशास्त्राचा अभ्यास म्हणावा तितका आपल्याकडे झालेला नाही. मात्र पाश्चात्त्य देशात अनुवादावर जास्त भर दिला गेला आहे. भारतीय भाषांमध्ये अनुवादाला प्रतिष्ठा मिळवून द्यायची असेल तर, अनुवादाचे काही मानदंड निर्माण करणे गरजेचे आहे. अनुवादित साहित्याने मराठी कादंबरीच्या कक्षा रूंदावल्या आहेत. आज अनुवादित कादंबरीच्या संख्येत लक्षणीय वाढ होऊ लागली आहे. कन्नड साहित्य हे मराठी साहित्यामध्ये कसे रूढ होत चालले आहे याची कल्पना येते.

या प्रकरणामध्ये अनुवाद म्हणजे काय, अनुवादाचे स्वरूप , मराठी अनुवादित कादंबरीचा आढावा आणि कन्नड साहित्यातील अनुवादाचा थोडक्यात आढावा घेतला आहे. प्रस्तुत 'पर्व' कादंबरी मध्ये रूढ मिथकांचे वेगळेपण स्पष्ट करून नवा अन्वयार्थ भैरप्पांनी स्पष्ट केला आहे. हे मिथकांचे वेगळेपण पाहण्याआधी आपण मिथकः स्वरूप संकल्पना कशा स्वरूपाची आहे हे समजून घेणार आहोत. त्याचा आढावा पुढीलप्रकणात पाहणार आहोत.

**संदर्भसूची:-**


१) कऱ्हाडे, सदा : 'भाषांतर', लोकवाङ्मय गृह मुंबई, आवृत्ती दुसरी, १९९८ पृ. २.

२) काळे, कल्याण : 'भाषांतरमीमांसा : एक दृष्टिक्षेप' (संपा:काळे, कल्याण, सोमण, अंजली : 'भाषांतर मीमांसा'), प्रतिमा प्रकाशन पुणे, आवृत्ती पहिली १९९७ पृ. ७.

३) जोशी, लक्ष्मणशास्त्री : 'मराठी विश्वकोश खंड - १२', महाराष्ट्रराज्य मराठी शब्दकोश निर्मित मंडळ मुंबई, आवृत्ती पहिली १९८५ पृ. ४८०.

४) नेमाडे, भालचंद्र : 'भाषांतर मीमांसाचे स्वरूप', नवभारत, ऑगस्ट १९८३ पृ. २७.

५) काळे, कल्याण : 'भाषांतर मीमांसा : एक दृष्टिक्षेप' (संपा : काळे, कल्याण, सोमण, अंजली : 'भाषांतर मीमांसा'), प्रतिमा प्रकाशन पुणे, आवृत्ती पहिली १९९७ पृ. ११.

६) भिडे, वि. वा : 'सारस्वत शब्दकोश भाग - दुसरा' चित्रशाळा प्रकाशन पुणे, आवृत्ती दुसरी १९७७ पृ. १४०१.

७) रॉबीन, सी. के: 'भाषांतर शास्त्र की कला' (संपा : फाटक, म. वि. : ठाकर रजनी) वरदा बुक्स पुणे, आवृत्ती प्रथम १९८७ पृ. ९.

८) मुळे, वीणा : 'अस्थातंत्र साहित्य परिभाषा' प्रतिष्ठान, जाने १९७५ पृ. २०.

९) काळे, कल्याण : 'भाषांतरमीमांसा : एक दृष्टीक्षेप' (संपा : काळे, कल्याण, सोमण अंजली : 'भाषांतर मीमांसा') प्रतिमा प्रकाशन पुणे, आवृत्ती पहिली १९९७ पृ. ७.

१०) कऱ्हाडे, सदा : 'भाषांतर', लोक वाङ्मयग्रह मुंबई, आवृत्ती दुसरी १९८८ पृ. ६.

११) बांदिवडेकर, चंद्रकांत : 'मराठी वाङ्मयाचा इतिहास १९२० - १९४७', मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे, आवृत्ती दुसरी १९९६ पृ. १४४.

१२) काळे, कल्याण : 'भाषांतर मीमांसा : एक दृष्टीक्षेप' (संपा : काळे, कल्याण, सोमण, अंजली, 'भाषांतरमीमांसा') प्रतिमा प्रकाशन पुणे, आवृत्ती पहिली १९९७ पृ. ९.

१३) दादेगावकर, पद्माकर : 'साहित्याचे भाषांतर आणि वर्डस ऑफ विसड्म: एक टिपण' पंचधारा, जुलै - स्पटें १९९८ पृ. ५४.

१४) विश्वनाथ, अरविंद : 'भाषांतर की प्रतिनिर्मीती' पंचधारा, जुलै - सप्टें १९९८ पृ. ३०.

१५) काळे, कल्याण : 'भाषांतर मीमांसा: एक दृष्टिक्षेप' (संपा : काळे, कल्याण, सोमण, अंजली : 'भाषांतरमीमांसा') प्रतिमा प्रकाशन पुणे, आवृत्ती पहिली १९९७ पृ. ३२.

१६) संगोराम, श्रीरंग : 'हिंदी - मराठी भाषांतरातील प्रश्न' (संपा : काळे, कल्याण, सोमण, अंजली : 'भाषांतरमीमांसा'), प्रतिमा प्रकाशन पुणे, आवृत्ती पहिली १९९७ पृ. २८०.

१७) कुलकर्णी, व. दी. : 'मराठी साहित्य : विमर्श आणि विमर्शक', पद्मगंधा प्रकाशन पुणे, आवृत्ती पहिली २००१, पृ. ३७०.

१८) कऱ्हाडे, सदा : 'भाषांतर', लोकवाङ्मय ग्रह मुंबई, आवृत्ती दुसरी १९९८. पृ. ५०.

१९) देशपांडे, कुसुमावती : 'मराठी कादंबरी : पहिले शतक १८५०-१९५०', मुंबई मराठी साहित्य संघ प्रकाशन मुंबई, आवृत्ती दुसरी १९७५, पृ. ३२३.

२०) नेमाडे, भालचंद्र : 'टीकास्वयंवर', संकेत प्रकाशन औरंगाबाद, आवृत्ती पहिली १९९१ पृ. १९६.

२१) बांदिवडेकर, चंद्रकांत : 'मराठी कादंबरीचा इतिहास १९२० - १९४७', मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे, आवृत्ती दुसरी १९९६ पृ. ६.

२२) जोशी, लक्ष्मणशास्त्री (संपा) : 'मराठी विश्वकोश खंड - ३' महाराष्ट्रराज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई आवृत्ती पहिली, १९७६ पृ. ६००.

२३) बापट, प्र. वा. गोडबोले ना. वा. (संपा) : 'मराठी कादंबरी तंत्र आणि विकास', व्हीनस प्रकाशन पुणे, आवृत्ती दुसरी १९५७ पृ. ३३.

२४) नेमाडे भालचंद्र : 'टीकास्वयंवर' संकेत प्रकाशन औरंगाबाद, आवृत्ती पहिली १९९०, पृ. १९९.

२५) लीव्हर, कॉथरीन : 'वाङ्मयीन संज्ञा संकल्पना कोश' (संपा - गणोकरकर, डहाके, दडकर, भटकळ, राजवाडे, बरखेडे), ग. रा. भटकळ फाऊंडेशन मुंबई, आवृत्ती पहिली २००१ पृ. १७० वरुन उदघृत

२६) बांदिवडेकर, चंद्रकांत : 'मराठी कादंबरीचा इतिहास १९२० १९४७', मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे, आवृत्ती दुसरी १९९६ पृ. १४८.

२७. तत्रैव : पृ. १४५.